# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 05 November 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०५ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात सर्वत्र प्रचाराला सुरुवात.
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचे सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत.
- राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर संजय वर्मा यांची नियुक्ती.
- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला २५ नोव्हेंबर पासून सुरूवात.

आणि

- केंद्रीय निवडणूक आयोगाचे पाच वरिष्ठ अधिकारी उद्या छत्रपती संभाजीनगर इथं निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेणार.

****

राज्य विधानसभा निवडणुकीत उमेदवारांचं चित्र स्पष्ट झाल्यानं आता प्रचार सुरु झाला आहे. विविध राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना आजपासून सुरुवात झाली आहे. प्रचाराला केवळ १४ दिवसांचा कालावधी असल्यानं प्रभावी प्रचारावर उमेदवारांचा भर दिसून येत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज कोल्हापूर इथं महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ होणार आहे.

औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी सातारा इथल्या खंडोबारायाचं दर्शन घेऊन प्रचाराचा प्रारंभ केला, तर आज संध्याकाळी शहरात एमआयएम पक्षाचे आमदार अकबरूद्दीन ओवेसी जाहिर सभा घेऊन पक्ष प्रचाराला सुरूवात करणार आहेत. औरंगाबाद मध्यचे महायुतीचे

उमेदवार प्रदीप जैस्वाल आज मित्र पक्षासह पद यात्रेद्वारे नागरिकांशी संवाद साधत आहेत.

भाजप नेते, उपमुख्यमंत्री आणि नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं जनसंपर्क रॅली काढून प्रचाराचा प्रारंभ केला. नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार विकास ठाकरे यांनी देखील नागपूर इथं जनआशीर्वाद यात्रा काढून प्रचाराची सुरुवात केली. नागपूर उत्तर मतदारसंघाचे आमदार डॉ. नितीन राऊत देखील आज शहराच्या विविध भागात प्रचार करत आहेत.

मानखुर्द–शिवाजीनगर मतदारसंघातले राष्ट्रवादीचे उमेदवार नवाब मलिक यांनी देखील प्रचाराला सुरुवात केली.

साताऱ्यात कोरेगाव इथं शिवसेनेचे उमेदवार महेश शिंदे यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा झाली. भंडारा विधानसभा मतदार संघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बंडखोर उमेदवार नरेंद्र पहाडे यांनी विविध ठिकाणी पूजा करत प्रचाराला सुरुवात केली.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामतीत शिर्सुफळ गावात पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या समर्थनार्थ प्रचार सभा घेतली. राज्यसभेचा आपला दीड वर्षांचा कार्यकाळ बाकी असून, यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचं की नाही, याचा विचार करावा लागेल, असं सांगून त्यांनी, सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत. राजकारण फक्त निवडणूक आणि सत्तेसाठी नाही, तर लोकांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी करायचं असतं, असं सांगून या भागात विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या कामाचा लेखाजोखा त्यांनी मांडला.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज विदर्भात प्रचार दौऱ्यावर आहेत. राळेगाव इथं मनसेचे उमेदवार अशोक मेश्राम यांच्या प्रचारार्थ त्यांची जाहीर सभा होत असून, वणी इथले उमेदवार राजू उंबरकर यांच्या प्रचार सभेला देखील ते संबोधित करणार आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी उद्या नागपूर दौऱ्यावर येणार आहेत.

****

भाजप नेत्या आणि माजी खासदार हिना गावित यांनी भाजपच्या अक्कलकुवा मतदारसंघात बंडखोरी केली. त्यांनी अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करुन, भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. पक्षाची प्रतिमा ढासळू नये यासाठी हा निर्णय घेतल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. शिवसेना शिंदे गटाच्या विरोधात लढण्याचा निर्णय घेतला असल्याचं गावित यांनी सांगितलं.

****

अलिबाग–मुरुड मतदारसंघाचे भाजपचे पदाधिकारी दिलीप भोईर यांचं पक्षातून सहा वर्षासाठी निलंबन करण्यात आलं आहे. महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्याविरुद्ध त्यांनी उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यानं निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचं भाजप खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितलं.

****

महायुतीतमध्ये जे – जे मतदारसंघ सोडण्याचं निर्धारित झालं होतं, त्याठिकाणी एकत्रित काम कसं करता येईल यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु असल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. बंडखोर उमेदवारांची एक–दोन दिवसात समजूत घालून त्या – त्या मतदारसंघातलं वातावरण योग्य पद्धतीने पूरक होईल असा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. २८८ जागांवर महायुती पूर्ण ताकदीने एकत्रित निवडणूक लढत असल्याचं तटकरे यांनी स्पष्ट केलं.

****

निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात येत्या आठ ते १४ नोव्हेंबर दरम्यान ११ सभा घेणार आहेत. आठ नोव्हेंबरला धुळे आणि नाशिक, नऊ तारखेला अकोला आणि नांदेड, १२ तारखेला चंद्रपूर, चिमूर, सोलापूर आणि पुणे आणि १४ नोव्हेंबरला संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबईत पंतप्रधानांच्या सभा होणार आहेत.

****

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर आज संजय वर्मा यांची नियुक्ती झाली. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२८

मध्ये ते निवृत्त होणार आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांनी केलेल्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगानं काल रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवण्याचे आणि त्यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले होते.

****

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला २५ नोव्हेंबर पासून सुरूवात होणार आहे. हे अधिवेशन २० डिसेंबरपर्यंत चालेल. या काळात २६ नोव्हेंबरला संविधान स्वीकृतीचा पंच्याहत्तरावा वर्धापन दिन संविधान सभेच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरा केला जाईल अशी माहिती, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सामाजिक माध्यमांवर दिली.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

**बाईट – मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम**

****

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात एकूण सहा लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये तीन लाख ८४ हजार ६९ पुरुष, दोन लाख ५७ हजार ३१७ महिला, तसंच ३९ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने ही माहिती दिली. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग मतदार आहेत.

****

मतदान केंद्रांवरची गर्दी टाळण्यासाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात यावी, तसंच मतदारांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याकडे केली आहे. पक्षाचे नेते सुभाष देसाई यांनी आज चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि विविध मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या. मतदान यंत्रांच्या बॅटरीवरून सुरू असलेला वाद थांबवण्यासाठी मतदान सुरू करताना आणि बंद होताना मतदान यंत्रांमधल्या बॅटरी किती चार्ज होत्या, याची नोंद ठेवण्यात यावी, अशी मागणीही पक्षानं केली आहे.

****

महिलांबद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांवर निवडणूक आयोगानं कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातल्या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर, काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी त्यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करावी अशी मागणी उपाध्ये यांनी केली आहे

****

भारत ब्रँड आटा आणि तांदळाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन आज ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते दिल्ली इथं झालं. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी सरकारनं हे पाऊल उचलल्याचं जोशी यावेळी म्हणाले. सध्या भारत ब्रँड आटा ३० रुपये किलो आणि भारत ब्रँड तांदूळ ३४ रुपये किलो दरानं उपलब्ध आहे. भारत ब्रँड पदार्थांच्या विक्रीमुळे या खाद्यपदार्थांच्या किमती कमी होण्यास मदत होईल असंही त्यांनी सांगितलं.

****

केंद्रीय निवडणूक आयोगाचे पाच वरिष्ठ अधिकारी उद्या छत्रपती संभाजीनगर इथं जिल्ह्याच्या निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेणार आहेत. उद्या शहरातल्या स्मार्ट सिटी कार्यालयात ही आढावा बैठक पार पडणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह नागपूर, अमरावती विभागाचाही आढावा यावेळी घेतला जाईल. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

मतदान जनजागृती करण्यासाठी परभणी जिल्हाधिकारी कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयाच्यावतीनं, निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वाहनांवर, मी मतदान करणार, असे स्टिकर्स लावण्यात आले आहेत. तसंच कलापथकांच्या वाहनांवर आवाजाचे भोंगे लावून मतदान करण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण औद्योगिक वसाहत, मौजे पिंपळवाडी, बालानगर परिसरात आज केंद्रीय राखीव

पोलीस दलाने संचालन केल. सी आर पी एफ चे दोन अधिकारी २८ जवानांसह ५२ स्थानिक पोलीस संचालनात सहभागी झाले होते.

****